वर्ष : ०४ | अंक: ३३ | मुंबई, मंगळवार १० जुलै २०१८ ते १६ जुलै २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 पोषण आहार योजना कागदावरच

3 → कुठलाच रस्ता निर्धोक नाही!

झाकीर नाईकला भारतात पाठवणे शक्य नाही ← 4




# मुंबापुरी की तुंबापुरी



## मुंबईसह महाराष्ट्रात विक्रमी पाऊस, शाळा- महाविद्यालयांना सुट्टी



**मुंबई- गेल्या दोन दिवसांपासून जोरदार बॅटींग करणाऱ्या पावसाने आज तिसऱ्या दिवशीही मुंबई-ठाण्याला अक्षरशः धो धो धुऊन काढले. ठिकठिकाणी साचलेलं पाणी, वाहतुकीची कोंडी आणि रेल्वेच्या खोळंब्यामुळे निर्माण झालेली गर्दी यामुळे चाकरमान्यांची दैना उडाली. मुसळधार पावसामुळे मध्य रेल्वे अर्धा तास उशिराने धावत असल्याने मुंबईतील अनेक स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली आहे. मुंबईत गेल्या २४ तासांत विक्रमी पावसाची नोंद झाली असून २४ तासांत मुंबईत कुलाबा वेधशाळेने १८२ मिमी पावसाची तर सांताक्रुझ वेध शाळेने १३७ मिमी पावसाची नोंद केली आहे.**

तसेच खबरदारीचा उपाय म्हणून मुसळधार पावसामुळे मुंबईतील सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. गेल्या तीन दिवसांपासून मुंबईत पावसाने जोर धरल्याने किंग्स सर्कल, चेंबुर सुमन नगर येथील साठे पूल, मुलुंड सोनारपाडा, दहिसर आनंद नगर आणि वांद्रे कलानगर येथे एक फुटापर्यंत पाणी साचले असून दादर हिंदमाता येथे ६ इंचापर्यंत पाणी तुंबले आहे.

उर्वरित पृष्ठ 3 वर

## सिडको जमीन प्रकरणात काहीतरी काळबेरं - अजित पवार

**नागपूर-** 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सिडकोच्या व्यवहारांना स्थगिती दिली याचाच अर्थ त्यात नक्कीच काहीतरी काळबेरं आहे, अस वक्तव्य राष्ट्रवादी नेते अजित पवार यांनी केलं. सिडको जमीन प्रकरणाची आणखीन काही कागदपत्रे आमच्या हाती लागली आहेत. हा विषय लवकरच आम्ही अधिवेशनात मांडणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. मागील आठवड्यातच मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणास स्थगिती देत त्यांनी विधानसभेत या प्रकरणाचा खुलासा केला. 'सिडको जमीन प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येईल. त्या अनुषंगाने या संपूर्ण व्यवहाराला स्थगिती देण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना कळवण्यात आलं आहे. या जमिनीची विक्री



होणार नाही याची खबरदारी घ्यावी. त्याचप्रमाणे महसूल विभागामार्फत कळवण्यात आलं आहे की कोणताही थर्ड पार्टी इंटरेस्ट निर्माण होऊ नये, याबाबतची घबरदारी घेण्यात येईल. जोपर्यंत न्यायलयीन चौकशी होऊन अहवाल येत नाही, तोपर्यंत यासंबंधी कोणतीही कारवाई, जसे विक्री, हस्तांतरण, भाड्याने देणं या सर्वांवर प्रतिबंध घालण्यात आला आहे'नवी मुंबईतील सिडकोच्या २४ एकर जमीन व्यवहारात कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप काँग्रेसने केला. कोयना प्रकल्पग्रस्तांना देण्यात आलेली १७६७ कोटी रुपयांची जमीन बांधकाम व्यावसायिक मनिष भतीजा यांना अवघ्या साडेतीन कोटी रुपयांत विकण्यात आली. हा व्यवहार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडील नगरविकास खाते, सिडको आणि भाजपाचे आमदार प्रसाद लाड यांच्या संगनमतानं झाल्याचा दावा काँग्रेस नेत्यांनी केला आहे.आज अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यातील पहिला दिवस आहे. हिवाळी सोडून पावसाळी अधिवेशन नागपुरात घेण्यामागचा उद्देश काय होता, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. 'विदर्भाला न्याय द्यायचा आहे तर डिसेंबरमध्ये महिनाभर अधिवेशन नागपुरात घ्यायचं होतं, पावसाळ्याची कोणतीही तयारी नसताना अधिवेशन डोक्यावर मारलं,' अशीही टीकाही त्यांनी केली'.

## ताजमहाल जागतिक आश्चर्य, तिथे नमाज पठण नको -सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली-** जागतिक आश्चर्य असणाऱ्या ताजमहालमध्ये नमाज पठणास परवानगी देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. ताजमहालचे ऐतिहासिक महत्व आहे. जगातील सात आश्चर्यात ताजची गणना होते. त्यामुळे त्याठिकाणी नमाज पठण करू नये, असे न्यायालयाने म्हटले आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने अन्य स्थळे नमाज पठणासाठी असल्याचे सूचित केले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे. ताजमहालमध्ये करण्यात येणाऱ्या नमाज पठणाला काही गटांचा विरोध आहे. नमाज काळात शुक्रवारी ताजमहल बंद ठेवण्यात येतो. त्यामुळे देश-विदेशातील पर्यटकांची गैरसोय होते, अशा तक्रारी समोर आल्या होत्या.



## टिळा, गंडे, दोरे नकोत; नवीन पोलिस आयुक्तांच्या सूचना

**मुंबई- 'मुंबई पोलिस दलाचे नाव आदराने घेतले जाते. ही प्रतिमा कायम जपण्यासाठी स्वच्छ खाकी वर्दी परिधान करा', अशा स्पष्ट सूचना मुंबईचे नवे पोलिस आयुक्त सुबोध जयस्वाल यांनी पोलिसांना दिल्या आहेत. विशेष म्हणजे गणवेश घालून कामावर असताना टिळा, गंड दोरे बांधू नयेत, असेही त्यांनी स्पष्टपणे बजावले आहे.**

भारतीय गुप्तचर संघटना 'रॉ'मध्ये कामाचा अनुभव असलेले शिस्तप्रिय सुबोध जयस्वाल यांनी मुंबई पोलिस दलाला शिस्त लावण्यास सुरुवात केली आहे. याची सुरुवात त्यांनी खाकी वर्दीपासून केली आहे. आयुक्तपदाची धुरा हाती घेतल्यापासून आठ दिवसांतच त्यांना अधिकारी आणि अंमलदार व्यवस्थित गणवेश परिधान करीत नसल्याचे निदर्शनास आले. यामुळे पोलिस दलाची प्रतिमा डागाळत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'गणवेश स्वच्छ, नीटनेटका व इस्त्री केलेला असावा आणि कुठेही शिलाई उसवलेली नसावी, असे त्यांनी जारी केलेल्या विशेष सूचनांमध्ये नमूद केले आहे. वर्दीवर असताना कपाळावर टिळा लावणे टाळावे, गळ्यात, मनगटावर गंडा-दोरा बांधू नये, असेही त्यांनी म्हटले आहे.

बुटापासून टोपीपर्यंत वर्दी कशी परिधान करावी, याच्या मार्गदर्शक सूचना त्यांनी जारी केल्या असून, प्रत्येक पोलिस ठाण्यात त्या दर्शनी भागांत लावाव्यात, असेही म्हटले आहे. वर्दीवरील नावाची पाटी, केसाची रचना, मेडल, स्टार इतकेच नाही तर पट्टा, मोजे कोणत्या रंगाचे आणि कसे वापरावेत हेही सुबोध जयस्वाल यांनी आपल्या सूचनांमध्ये स्पष्ट नमूद केले आहे.



## सौजन्य व्हॉट्सअप




## दिल्लीतील ११ जणांचं मृत्यूचं प्रकरण
## आता प्रेम प्रकरण आलं समोर

**नवी दिल्ली-** बुराडीच्या संत नगरमध्ये भाटिया कुटुंबातील ११ लोकांच्या रहस्यमय मृत्यूनंतर पोलिसांच्या हाती आणखी एक डायरी लागली आहे. रोज या प्रकरणात नवीन नवीन खुलासे होत आहेत. दैनिक जागरणच्या बातमीनुसार ललित यांची भांची प्रियंकाची एक प्रायव्हेट डायरी पोलिसांच्या हाती लागली आहे. ज्यानंतर या ११ लोकांच्या मृत्यूचं प्रकरण आणखी वेगळ्याच दिशेकडे गेलं आहे. प्रकरणाचा गुंता आणखी वाढला आहे. अंधश्रद्धेनंतर आता प्रेम प्रकरण समोर आलं आहे. डायरीच्या कवर पेजवर सुंदर मुलगी असं लिहिलं आहे. हृद्याच्या आकाराने पहिलं पान कापलं आहे. सिल्वर पेपरने ते सजवण्यात आलं आहे.डायरीमध्ये प्रियंकाने मॉडल टाउनमध्ये राहणाऱ्या एका युवकाबद्दल लिहिलं आहे. युवकासोबत मैत्री आणि संबंध याचा उल्लेख तिने डायरीत केला आहे आणि याबद्दल मामाची माफी देखील मागितली आहे.



पोलिसांच्या सूत्रांच्या माहितीनुसार, ही नवी डायरी समोर आल्याने चौकशीला आणखी एक नवी दिशा मिळाली आहे. पोलीस आता त्या मुलाचा शोध घेत आहे. यानंतर या प्रकरणात आणखी काही रहस्य समोर येण्याची शक्यता आहे.

## निर्भयाच्या 3 आरोपींना फाशी कायम, सुप्रीम कोर्टाने फेटाळली फेरविचार याचिका

**नवी दिल्ली-** २०१२च्या निभऱ्या बलात्कार आणि खून प्रकरणात दोषी नराधमांची फाशी कायम राहणार आहे. यावर आज सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला आहे. दोषींनी सुप्रीम कोर्टात फेरविचार याचिका दाखल केली होती. आमची फाशी म्हणजे न्यायाच्या नावावर सरकारकडून केला जाणारा खून आहे, असा युक्तिवाद त्यांनी याचिकेत केला होता. पण त्यावर सुप्रीम कोर्टाने या नराधमांना फाशी देण्याचा निर्णय कामय ठेवला आहे.मे २०१८मध्ये हा निर्णय राखून ठेवण्यात आला होता. आणि अखेर यावर कोर्टाने निर्णय दिला आहे. मुख्य न्यायमूर्ती दीपक मिश्रा, न्यायमूर्ती आर. भानुमती आणि न्यायमूर्ती अशोक भूषण यांच्या खंडपीठापुढे, २९ वर्षीय मुकेश, २२ वर्षीय पवन गुप्ता आणि विनय शर्मा यांनी




फाशीच्या शिक्षेच्या विरोधात पुनर्विचार याचिका दाखल केली होती, परंतु ही याचिका न्यायालयाने फेटाळली आहे आणि त्यांना फाशीची शिक्षा कायम ठेवण्यात आली आहे.

# गोरेगावात राहत्या घरात सापडला शस्त्रसाठा दाऊदच्या साथीदाराच्या पत्नीला अटक




**मुंबई- ठाण्याच्या खंडणी विरोधी पथकाने मुंबईतून गोरेगाव येथील बांगूर नगरमधील घरातून यास्मीन नईम खान (वय 35) हिला एके 56, 95 जिवंत काडतुसे, 9 एमएमच्या 2 पिस्तूल, 13 जिवंत काडतुसे आणि 3 मॅगझीन या शस्त्रसाठ्यासह अटक केली आहे. यास्मीन ही महिला कुख्यात गुंड दाऊद इब्राहिमच्या टोळीतील नईम या सदस्याची पत्नी आहे. नईमला मुंबई गुन्हे शाखेने 20 एप्रिल 2016ला अटक केली होती. 5 जुलै रोजी ठाण्यातील साकेत रोडवर कुख्यात ड्रग्स तस्करी करणारे येणार असल्याची माहिती खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप शर्मा यांनी मिळाली होती.**

त्यानंतर सापळा रचून जाहिद अली शौकत काश्मिरी (वय ४७) आणि संजय बिपीन श्रॉफ (वय ४७) या नागपाड्यात राहणाऱ्या दोघांना शिताफीने पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्या अंगझडतीत १० ग्रॅम कोकेन आणि १ लाख ५७ हजार २५० रुपये सापडले. त्यांना एनडीपीएस ॲक्टअन्वये अटक करण्यात आली होती. त्यांना न्यायालयाने ११ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, पोलिसांच्या चौकशीत जाहिद या आरोपीने कुख्यात गुंड दाऊदचा सदस्य नईम फईम खानच्या बांगूरनगर येथील घरात शस्त्रसाठा असल्याची माहिती दिली होती.

त्यानुसार ठाण्यातील खंडणी विरोधी पथकाने गोरेगाव येथे काल रात्री धाड घालत यास्मीन नईम खानला एके ५६, ९५ जिवंत काडतुसे, ९ एमएमच्या २ पिस्तूल, १३ जिवंत काडतुसे आणि ३ मॅगझीन या शस्त्रसाठ्यासह अटक केली. या महिलेचा पती नईम खानला मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने २० एप्रिल २०१६ रोजी भादंवि कलम ३०२, १२० (ब) आणि बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी अटक केली होती. या गुन्ह्यात इतर ४ आरोपी अटकेत असून कुख्यात गुंड छोटा शकीलने दिलेल्या सुपारीवरून इक्बाल अत्तरवालाला ठार मारण्यासाठी आले असताना नईमला इतर चार साथीदारांसह रंगेहाथ पोलिसांनी पकडले होते. हे सर्व आरोपी ठाणे कारागृहात आहेत.

# पोषण आहार योजना कागदावरच

**मुंबई- आदिवासी भागांतील कुपोषण कमी करण्यासाठी गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात राज्यसरकारने पोषण आहार योजनेची घोषणा केली. यावर्षी मार्च महिन्यापर्यंत ही योजना कार्यान्वियित होऊन त्याचा पहिला टप्पा पूर्ण करणे अपेक्षित होते. मात्र सरकारच्या उदासीन धोरणामुळे ही योजना अद्याप कागदावरच राहिली आहे.**

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या चौथ्या पाहणीमध्ये राज्यातील एकूण मुलांपैकी एक तृतीयांश मुले ही कमी उंचीची आहेत. त्यातील एक चतुर्थांश मुले ही उंचीप्रमाणे कमी वजनाची तर निम्मी मुले ही रक्तपांढरी असल्याचे दिसून आले. राज्याच्या आदिवासी भागामध्ये कुपोषणाची समस्या गंभीर असल्याने कुपोषण निर्मूलनासाठी नवीन पोषण आहार योजना आखण्याचा निर्णय सरकारने घेतला. राज्य सरकारच्या आदिवासी



विभागातर्फे हा विशेष गडचिरोली, नंदुरबार, पालघर, नाशिक यांसारख्या सात जिल्ह्यांतील ४०० गावांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येणार होता. योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी टाटा सामाजिक संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. या प्रकल्प तीन वर्षांत राबवण्यात येणार असून त्यातील प्रारंभिक टप्पा व मुलभूत सर्वेक्षणासाठी ऑक्टोबर २०१७ ते नोव्हेंबर २०१७ हा कालावधी निश्चित करण्यात आला होता. त्यानंतर या पहिल्या टप्प्यांची अंमलबजावणी डिसेंबर २०१७ पासून सुरू होण्याची गरज होती. मात्र आजतागायत त्यातील कोणत्याही कामाची सुरुवात झालेली नाही या प्रकल्पाच्या माध्यमातून कुपोषण कमी करण्यासाठी वेगवेगळ्या पातळ्यांवर भरीव काम करणे अपेक्षित आहे. बालकांचे पोषण आणि योग्य वाढ होण्यासाठी आशा कार्यकर्ती, अंगणवाडी सेविका आणि गावातल्या तरुणांना सोबत घेऊन प्रकल्पबांधणी करणे अपेक्षित होते.

# मुंबई बुडाली म्हणणारे वाचाळवीर आता कुठे आहेत?; नागपूर तुंबल्यानंतर शिवसेनेचा सवाल

**मुंबई-** मुसळधार पावसामुळे नागपूरची दैना उडाल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेनं भाजपावर निशाणा साधला. एरवी पावसामुळे मुंबईच्या केवळ सखल भागात वीतभर पाणी साचले तरी 'मुंबई बुडाली होएए' असा बेंबीच्या देठापासून कंठशोष करणारे वाचाळवीर आता कुठे आहेत?, असा सवाल शिवसेनेकडून उपस्थित करण्यात आला आहे. मुंबई महापालिका आणि शिवसेनेविरुद्ध कोणाला कितीही ठणाणा करू देत, पण काही तासांच्या पावसात नागपूर का बुडाले? कोणामुळे बुडाले? विधिमंडळाचे अधिवेशन स्थगित करण्याइतकी नाचक्की का ओढवली?, असे अनेक प्रश्न शिवसेनेचं मुखपत्र असलेल्या 'सामना'मधून उपस्थित करण्यात आले आहेत.

काल नागपूरमध्ये मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आलं. सतत सुरू असलेल्या पावसामुळे रस्ते पाण्याखाली गेल्यानं वाहतुकीचे तीन-तेरा वाजले. वीजपुरवठा खंडित झाल्यानं विधीमंडळाचं कामकाजदेखील होऊ शकलं नाही. यावरुन

**पावसानं नागपूरची दैना उडाल्यानंतर शिवसेनेकडून भाजपाचा समाचार**

शिवसेनेनं भाजपावर जोरदार हल्ला चढवला. 'नागपुरात सध्या विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरू आहे. अधिवेशनाच्या निमित्ताने राज्याचं संपूर्ण सरकारच नागपुरात आले आहे. तथापि, विधान भवनातच पाणी शिरल्यानं विधिमंडळाचं अधिवेशनच दिवसभरासाठी स्थगित करण्याची भयंकर नामुष्की सरकारवर ओढवली. दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कर्मभूमी असलेलं नागपूर काही तासांच्या पावसानं जलमय झालं. आमदार निवास, मंत्र्यांचे बंगले, वीज उपकेंद्रे सारं काही पाण्यात आहे. अधिवेशनासाठी आलेले अधिकारी, कर्मचारी आणि प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींचेही अतोनात हाल झाले. आपल्या डोळ्यासमोर शहरात पाणी भरतं आहे, रस्त्यांचं रूपांतर नद्यांमध्ये होत आहे, हे पाहून मुख्यमंत्रीही नक्कीच व्यथित झाले असणार.



# रेल्वे पोलिसांनी व्हाया 'मुंबई ते गुजरात' लावला चोरट्यांचा शोध

**मुंबई-** बोरिवली रेल्वे स्थानकातून अहमदाबादला जात असलेल्या महिला प्रवाशाच्या पर्समधून पावणे सहा लाखांचे हिरेजडित दागिने चोरणाऱ्या आरोपीच्या बोरिवली रेल्वे पोलिसांनी सीसीटीव्हीच्या मदतीने मुसक्या आवळल्या आहेत. आरोपीकडून चोरीचा मुद्देमाल जप्त केला असून सुरत येथील सराफाकडे विकलेले सोने देखील पोलिसांनी जप्त करून चोरीचा माल खरेदी करणाऱ्या सराफाला अटक केली आहे.



भाईंदर येथे राहणारे व्यापारी राहुल कैलासचंद्र अगरवाल (३०) हे लहान भावाच्या लग्नकार्यासाठी अहमदाबाद येथे पत्नी व इतर नातेवाईकांसह जाण्यासाठी १८ जून रोजी बोरिवली रेल्वे स्थानकात आले. त्यांनी फलाट क्रमांक ६ वरून प्रवाशांच्या गर्दीतून गुजरात एक्स्प्रेस पकडली. ट्रेन रेल्वे स्थानकातून पुढे गेल्यानंतर नेहा यांच्या लक्षात आले की, त्यांच्या शोल्डर पर्समध्ये ठेवलेली ५ लाख ७५ हजार २०० रुपये किंमतीचे हिरेजडित दागिन्यांची पर्स गर्दीचा फायदा घेत चोरल्याची खात्री झाली. त्यानुसार त्यांनी अहमदाबाद येथे उतरल्यानंतर याची तक्रार दाखल केली. हा गुन्हा बोरिवली रेल्वे स्थानकात घडल्याने या गुन्ह्यचा तपास बोरिवली रेल्वे पोलिसांकडे वर्ग करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास बोरिवली रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजयकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र भिसे, मोहिते, बुगडे, देवकर, कुंभार, माने आर्दीनी सुरू केला. घटनास्थळावरून सीटीटीव्ही फुटेजची पाहणी केलेल्या पोलिसांना ५ जुलै रोजी ते गस्त घालत असताना एक संशयित प्लॅटफॉर्मवर भटकताना दिसून आला. त्या संशयिताला ताब्यात घेऊन गुन्ह्याच्या दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता संशयिताचा वावर त्या दिवशी प्लॅटफॉर्मवर दिसून आला. अधिक तपासात संशयिताची श्रीकांत प्रविणचंद्र दामाणी (४८) अशी ओळख झाली. मालवणी, आंबोजवाडी येथे राहणाऱ्या दामाणीने पोलिसांनी गुन्ह्याची कबुली दिली.

# अंधेरीत भररस्त्यात विद्यार्थ्याची हत्या

**मुंबई-** चार दिवसांपूर्वीच आसामहून धर्मपठणाचे धडे घेऊन मुंबईत आलेल्या असगर अली खान (३०) या माथेफिरूतरुणाने शुक्रवारी सकाळी अंधेरीच्या डी. एन. नगर येथे भर रस्त्यात एका विद्यार्थ्यांची हत्या केली. वाहने, पादचाऱ्यांच्या घाईगर्दीत हे हत्याकांड घडल्याने परिसरात घबराट पसरली आहे.

जोडरस्त्यावरील वायएमसीए शाळेजवळ सकाळी नऊच्या सुमारास ही घटना घडली. डी. एन. नगर पोलीस ठाण्यात उपस्थित अधिकाऱ्यांनी आरोपी खानला ताब्यात घेतले. त्याने केलेल्या हल्ल्यात गंभीररीत्या जखमी झालेल्या तरुणाचे नाव अभिषेक शुक्ला (२४) असे आहे. अभिषेक मूळचा मध्य प्रदेशचा रहिवासी असून वित्त, बँकविषयक अभ्यासासाठी मुंबईत आला होता. कूपर रुग्णालयात उपचारांदरम्यान त्याचा मृत्यू झाला, अशी माहिती साहाय्यक आयुक्त विनय कुलकर्णी



यांनी दिली. पोलिसांनी हत्येच्या गुन्ह्यात खान याला अटक केली.

धर्मातील विधी, पथ्य याची जाणीव व्हावी यासाठी वडिलांनी खानला सहा महिन्यांसाठी आसामला धाडले होते. चार दिवसांपूर्वी मुंबईत आलेल्या खानने गुरुवारी चाकू विकत घेतला. त्याने शुक्रवारी सकाळी शुक्लाला रस्त्यात अडवले. तो त्याच्याकडे हातातील बॅग मागू लागला. शुक्लाने प्रतिकार करताच खानने त्याला भररस्त्यात भोसकले. वरकरणी चोरीच्या उद्देशाने हत्या घडली असे दिसत असले तरी पोलीस हे प्रकरण सर्व दृष्टिकोनातून तपासत आहेत. खान मानसिक रुग्ण असावा, असा पोलिसांना संशय आहे. त्याची मानसिक स्थितीही तपासली जाणार आहे, असे पोलीस ठाण्यातून सांगण्यात आले.

# खड्डयांमुळे सायन-पनवेल महामार्गावर वाहतूक कोंडी

**मुंबई-** मुसळधार पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे निर्माण झाल्याने सायन-पनवेल महामार्गावर वाहतुकीची प्रचंड कोंडी झाली आहे. आधीच पावसामुळे लोकल उशिरानं धावत असतानाच सायन-पनवेल महामार्गावर वाहतूक कोंडी झाल्याने मुंबई आणि पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांचे हाल होत आहेत.

कालपासूनच मुंबईसह ठाण्याला जोरदार पावसाने झोडपायला सुरुवात केली आहे. आज सकाळी पावसाने आणखीनच जोर धरल्याने मुंबईकरांची दाणादाण उडाली असून या पावसाने मुंबई महापालिकेचीही पोलखोल केली आहे. पावसामुळे मुंबईत अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असतानाच सायन-पनवेल महामार्गावरही ठिकठिकाणी खड्डे पडल्याने वाहतुकीची मोठी



कोंडी झाली आहे. खड्डयांमुळे या महामार्गावर एक किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. पावसामुळे गाडीतून बाहेरही येता येत नसल्याने प्रवाशांना वाहनांमध्येच तिष्ठत बसावे लागत आहे.

# पोलिसांच्या उडवाउडवीचा निवृत्त पोलिसाला फटका

**मुंबई-** गुन्हा नोंदवून घेण्यात पोलिसांकडून कशी टाळाटाळ केली जाते, याचा अनुभव नागरिकांना अनेकदा येत असतो. मात्र, पोलिसांच्या उडवाउडवीच्या 'चक्रव्युहा'तून एका निवृत्त पोलीस अधिकाऱ्याचीही सुटका होऊ शकलेली नाही. घर खरेदीसाठीची ४० टक्के रक्कम भरूनदेखील १५ वर्षांपासून घराचा ताबा न देणाऱ्या विकासकाविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी या माजी निरीक्षकाला तब्बल तीन वर्षे पोलीस ठाण्यात हेलपाटे घालावे लागले. अखेर गेल्या महिन्यात त्यांची तक्रार दाखल करून घेत विकासकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

शिवाजी नगर पोलीस ठाण्यातून २०१०मध्ये निवृत्त झालेले गनी मुजावर (६६) यांनी कुर्ला पोलीस ठाण्यात नेमणूक असताना २००५मध्ये याच भागातील एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत घर खरेदीचा निर्णय घेतला. १२ लाखांच्या एकूण रकमेपैकी पाच लाख रुपये त्यांनी विकासकाला सुपूर्दही केले. मात्र, आजतागायत त्यांना घराचा ताबा मिळालेला नाही. विक्रीकिमतीच्या ४० टक्के रक्कम अदा केल्यानंतर विकासकाकडून घरनोंदणी करार होणे आवश्यक होते. मात्र, विकासकाने 'आज करू, उद्या करू' असे सांगत मुजावर यांना झुलवत ठेवले. तर ते



पोलीस दलातून निवृत्त झाल्यानंतर त्याने सरळ हात वर करण्यास सुरुवात केली. मुजावर यांनी वकिलाकरवी मुजावर याला तीन कायदेशीर नोटिसा धाडल्या. मात्र, विकासकाने एकाही नोटिशीला उत्तर दिले नाही. अखेर मुजावर यांनी २०१४मध्ये कुर्ला पोलीस ठाणे गाठले. परंतु, 'या तक्रारीनुसार गुन्हा नोंद होऊ शकत नाही' असे उत्तर त्यांना मिळाले. दोन वर्षे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे हेलपाटे घालूनही गुन्हा नोंद न झाल्याने २०१६मध्ये मुजावर यांनी तत्कालिन पोलीस आयुक्त दत्ता पडसलगीकर यांची भेट घेऊन त्यांच्याकडे कैफियत मांडली. पडसलगीकर यांच्या आदेशानंतर कुर्ला पोलिसांनी मुजावर यांचा जबाब नोंदवून घेतला. मात्र, विकासकावर गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली.

# अफवा रोखण्यासाठी पोलिसांनी सुरु केली व्हॉट्सॲप हेल्पलाईन

**मुंबई-**मुलं पळवणारी टोळी गावात शिरल्याच्या अफवेवरुन धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यात जमावाने पाच जणांची ठेचून हत्या केल्याच्या घटनेनंतर महाराष्ट्र पोलिसांनी आता अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी खबरदारी म्हणून काही पावले उचलली आहेत. सोशल मीडियाच्या माध्यमातून पसरणाऱ्या अफवा रोखण्यासाठी महाराष्ट्र पोलिसांनी व्हॉट्सॲप हेल्पलाईन सुरु केली आहे. या उपक्रमातंर्गत पोलीस नियंत्रण कक्षातील व्हॉट्सॲप क्रमांक प्रसिद्ध करण्यात आले असून सर्वसामान्य नागरिक या क्रमांकावर मेसेज पाठवून मदत मागू शकतात किंवा जी अफवा पसरली आहे त्यात कितपत तथ्य आहे याची माहिती मिळवू शकतात असे पोलीस महानिरिक्षक ब्रिजेश सिंह यांनी सांगितले. त्याचबरोबर व्हायरल झालेल्या ज्या अफवा आहेत त्या मागची सत्यता शोधून काढण्यासाठी पोलीस आता एसएम होक्सस्लेयर, बूम फॅक्टस आणि अल्ट न्यूज या फॅक्ट चेकिंग म्हणजे सत्यता तपासणाऱ्या वेबसाईटसची मदत घेत आहेत.

आम्ही राज्यभरात १ हजार फलक लावले असून त्यावर पोलीस नियंत्रण कक्षाचे व्हॉट्सॲप क्रमांक दिले आहेत. राज्यभरात जागरुकता अभियान सुरु केले असून जिल्हा




पातळीवर पोलीस अधिकारी पत्रकार परिषद घेऊन जी अफवा पसरली आहे ती कशा पद्धतीने हाताळावी याविषयी मार्गदर्शन करतील असे ब्रिजेश सिंह यांनी सांगितले.

महापुरुषांची बदनामी करणारा किंवा दोन समाजात तेढ निर्माण करेल असा मजकूर, छायाचित्र, चित्र फेसबूक, ट्विटर या माध्यमांवरून काढून टाकणे शक्य आहे.

# मॅट्रिमोनियल साइटवरून २५ तरुणींची फसवणूक, एकाला अटक

**मुंबई-** मॅट्रिमोनियल साइटवरून लग्नाची मागणी करत, २५ तरुणींची फसवणूक करणाऱ्या एका ठगाच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले. एका महिलेने चारकोप पोलिसांत तक्रार दिल्यानंतर संपूर्ण प्रकरणाला वाचा फुटली. त्यानंतर, क्राइम ब्रांचच्या कक्ष ११ ने कृष्णा देवकाते (३१) नामक संशयिताला अटक केली आहे.

सविस्तर माहिती अशी, खासगी कंपनीत काम करणा-या सीमा (नावात बदल) या तरुणीने एका मॅट्रिमोनियल साइटवर नाव नोंदविले होते. जानेवारी २०१८ मध्ये देवकाते याने रिक्वेस्ट पाठविली. तो सरकारी सेवेत चांगल्या हुद्द्यावर नोकरीस आहे, अशी बनावट माहिती त्याने प्रोफाइलवर ठेवली होती. मात्र, मुळात तो एका कॉल सेंटरमध्ये काम करायचा. सीमाला त्याची प्रोफाइल आवडले. दोघांनी एकमेकांशी नंबर शेअर केले. संपर्क, त्यानंतर भेटीगाठी वाढल्या.

दरम्यान, काही बहाणे सांगत त्याने सीमाचे क्रेडिट कार्ड वापरून



अनेकदा तिच्या संमतीशिवाय लाखो रुपये काढले, तसेच तिचा विनयभंग केला. या प्रकरणी सीमाने चारकोप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. क्राइम ब्रांच युनिट ११ चे प्रमुख पोलीस निरीक्षक चिमाजी आढाव यांचे पथकही या ठगाच्या मागावर होते. यात देवकाते हा कल्याणला असल्याची माहिती त्यांच्या पथकाला मिळाली. त्यानुसार, पोलीस निरीक्षक घाग, पोलीस उपनिरीक्षक उतेकर, झिने आणि पथकाने दोन दिवस सापळा रचून देवकाते याच्या मुसक्या आवळल्या. चारकोपसह बीकेसी, नवी मुंबईत कोपरखैरणे, पुण्यात हडपसर येथील २५ हून अधिक तरुणींची फसवणूक करत, ५० लाखांचा अपहार केल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. महत्त्वाचे म्हणजे, नालासोपाड्यात अशाच प्रकारच्या गुन्ह्यातून तो जामिनावर सुटला होता. मात्र, पुन्हा तेच गुन्हे त्याने केले असून, या प्रकरणी पोलीस अधिक चौकशी करत आहेत. संशयिताला चारकोप पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

# शाळांमध्ये वाय-फाय जोडणीचे स्वप्न अधांतरीच

**मुंबई- शिक्षण विभागाला सातत्याने कुठली ना कुठली माहिती पुरवण्यासाठी सायबर कॅफेमध्ये तळ ठोकावा लागणाऱ्या राज्यातील शिक्षकांना सर्व शाळा वाय-फायने जोडण्याच्या स्वप्नाने दिलासा मिळाला असला तरी प्रत्यक्षात राज्यातील ३५ टक्के शाळांमध्ये संगणक नाही, तर पंधरा टक्के शाळांमध्ये अद्याप वीजही नाही त्यामुळे वाय-फायचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार का असा प्रश्न शिक्षकांकडूनच उपस्थित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वाय-फायपेक्षा व्यावसायिक दराने वीजबिलाची आकारणी बंद करावी अशी मागणीही शिक्षकांकडून करण्यात येत आहे.**

राज्यातील हजारो शिक्षकांच्या मागे 'तंत्रस्नेही' असल्याचे बिरुद आता चिकटले आहे. विद्यार्थ्यांना पुस्तकापलीकडील माहिती देण्यासाठी पुस्तकांवर क्यूआर कोड छापण्याचा आणि त्याला ॲप जोडून पूरक माहिती देण्याचा उपक्रमही राबवण्यात आला आहे. त्याच्या जोडीने शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी सर्व शाळा वाय-फायने जोडण्याची घोषणा केली. मात्र, मुळात राज्यातील सर्व शाळांमध्ये अद्यापही संगणक आणि वीज जोडणीदेखील नाही. असे असताना वाय-फायने शाळा जोडणे प्रत्यक्षात येणार का आणि



प्रत्यक्षात उतरले तरी त्याचा मुलांना किती उपयोग होणार, असा प्रश्न शिक्षकांकडून विचारला जात आहे. याबाबत औरंगाबाद जिल्ह्यातील एका शिक्षकांनी सांगितले, 'सध्या शिक्षकांचा फोन हा शासनाचा असल्याप्रमाणे शिक्षण विभाग आदेश देते. याशिवाय स्वच्छतागृहे आहेत, पण त्याला कड्या नाहीत, फरशा नाहीत, पाणी नाही.

## संपादकीय...



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

# कुठलाच रस्ता निर्धोक नाही!

मुंबईतील माणसांचे जगणे किती असुरक्षित आणि बेभरवशी आहे, याची जाणीव अंधेरीच्या घटनेने पुन्हा एकदा करून दिली आहे. मंगळवारी सकाळी अंधेरी रेल्वेस्थानकालगतचा पादचारी पूल रेल्वेमार्गावर कोसळल्यामुळे मुंबईकरांची जी काही दैना झाली, त्याला केवळ सर्व संबंधित यंत्रणांची निष्क्रियता आणि बेजबाबदारपणा कारणीभूत आहे. रेल्वे विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई महापालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) या सगळ्यांच्या सामूहिक प्रयत्नांमधून अलीकडच्या काही वर्षांमध्ये मुंबईकरांचे हाल चक्रवाढ गतीने वाढत आहेत. भविष्यातील सुखकर जगण्यासाठी काही काळ गैरसोय सहन करावी लागेल, थोडी कळ सोसावी लागेल असे म्हटले जात असले तरी या गैरसोयींमध्ये जीवच जाणार असेल तर मग भविष्यातील सुखाची स्वप्ने कुणासाठी? सुविधा निर्माण करण्यासाठी होणाऱ्या गैरसोयींचे ठीक आहे, परंतु संबंधित यंत्रणांच्या बेजबाबदारपणामुळे शेकडो लोकांचे जगणे धोक्यात येत असेल तर संबंधितांवर कारवाई व्हायला हवी. अनेक यंत्रणा काम करीत असल्याचा फायदा होण्याऐवजी त्या परस्परांवर जबाबदारी ढकलून नामानिराळे राहण्याचा प्रयत्न करीत असल्याचे संतापजनक चित्र दिसते. मुंबई महापालिकेच्या कारभाराचे धिंडवडे वारंवार निघत असतात, परंतु त्याबद्दल पालिकेतल्या पदाधिकाऱ्यांना खंत नसते किंवा मुंबईकरांना मोठी आश्वासने देणाऱ्या त्यांच्या नेत्यांना चाड नसते. करुन दाखवल्याच्या नुसत्या फुशारक्या मारल्या जातात, आणि



प्रत्यक्षात मुंबई बुडवून दाखवल्याचे चित्र समोर येते. अंधेरीचा पादचारी पूल कोसळल्यानंतर मुंबईकरांना दिलासा देण्याऐवजी मुंबईचे महापौर रेल्वेकडे बोट दाखवून नामानिराळे राहण्याचा प्रयत्न करतात, ही चीड आणणारी बाब आहे. रेल्वेमंत्री पीयूष गोयल यांनी शहरातील रेल्वेशी निगडीत ४४५ पुलांचा सुरक्षा आढावा घेण्याची घोषणा केली. त्यासाठी देशातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था असणाऱ्या आयआयटीचे साह्य घेतले जाणार असल्याचे तसेच सहा महिन्यांत मुंबई महापालिकेच्या सहकार्याने संयुक्त सुरक्षा आढावा घेण्याचे आश्वासन दिले. रेल्वेमंत्र्यांची ही घोषणा म्हणजे कोडगेपणाचा उत्तम नमुना म्हणता येईल. गतवर्षी एलफिन्स्टन स्टेशनवरील पुलाच्या जिन्यात झालेल्या चेंगराचेंगरीनंतर त्यांनी रेल्वेशी संबंधित पुलांचा सुरक्षा आढावा घेण्याची घोषणा केली होती. त्याच्या अहवालाचे काय झाले हे गोयल यांनी सांगितलेले नाही. अंधेरीचा जो पूल कोसळला त्या पुलाचा गतवर्षी नोव्हेंबरमध्ये आढावा घेतला गेला असता, त्यात कोणताही दोष आढळला नव्हता, असे त्यांनी म्हटले आहे. याचा अर्थ सुरक्षा आढावा घेणाऱ्या यंत्रणेने आपली जबाबदारी पार पाडली नव्हती. या क्षेत्रातील जाणकारांच्या म्हणण्यानुसार वातानुकूलित कार्यालयात बसून अशा आढाव्याची कागदपत्रे रंगवली जातात. लाखो लोकांच्या सुरक्षेचा विषय एवढ्या निर्ढावल्या पद्धतीने हाताळला जात असेल तर हा लोकांच्या जिवाशी चाललेला खेळ आहे, यात शंका नाही. एलफिन्स्टनच्या चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर मुंबईतील अशा अन्य ठिकाणांचा आढावा घेऊन त्यावर उपाययोजना करण्याची आश्वासनेही दिली गेली. परळ, करी रोड आदी ठिकाणी लष्कराच्या मदतीने पूल उभारून तत्परता दाखवण्यात आली. ती कौतुकास्पद असली तरी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून उपाय योजण्यात मात्र व्यापक निष्क्रियता दिसून येते. दादर स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक एकवर अद्याप चेंगराचेंगरीसारखी घटना घडलेली नाही, हे केवळ सुदैव म्हणावे लागेल. मुंबई लोकल प्रवाशांसाठी जीवघेणी ठरणारी आणखीही काही ठिकाणे आहेत. परंतु तेथील परिस्थिती बदलण्यासाठी ठोस पावले उचलली जात नाहीत. दुर्घटना घडल्यानंतर जागे व्हायचे, ही एकूण आपल्या यंत्रणांची कार्यपद्धती असते. अंधेरीच्या घटनेमध्ये सुदैवाने जीवितहानी झालेली नाही. गर्दीच्या वेळी किंवा खालून लोकल जात असताना ही दुर्घटना घडली असती तर काय चित्र झाले असते याची कल्पनाही करवत नाही. यंत्रणांना मात्र घटनेचे गांभीर्य नसल्याचेच वास्तव समोर येते. ज्यांनी नागरिकांच्या जीविताची काळजी घ्यायची आणि त्यांचे रोजचे जगणे सुसह्य करायचे त्या सगळ्या यंत्रणा कामचुकार बनल्यामुळे मुंबईकरांना देवावर भरवसा ठेवूनच बाहेर पडावे लागते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे दिवसेंदिवस परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडत चालली आहे. संकटे कमी होण्याऐवजी त्यांची संख्या आणि प्रमाणही वाढत चालले आहे. फूटपाथवरून चालणाऱ्या माणसालाही विमान कोसळण्याची भीती असते. रूळ ओलांडणे धोक्याचे आहे, पण पुलावरून चालणेही सुरक्षित राहिलेले नाही. थोड्याशा पावसामुळेही रेल्वे खोळंबते आणि थोडा जोर वाढला की रस्त्यांना तलावाचे स्वरूप येते. पाण्यातून चालत जावे तर कुठे ड्रेनेजचे झाकण उघडे असेल, हे सांगता येत नाही. मुंबईकरांसाठी आता कुठलाच रस्ता निर्धोक नाही.

# शेतकऱ्यांना 'अच्छे दिन'



**या वर्षीच्या खरीप हंगामापासून अन्नधान्याला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव दिला जाईल, या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांना अलीकडेच दिलेल्या आश्वासनांची केंद्रीय मंत्रिमंडळाने पूर्तता केल्याने, शेतकऱ्यांना 'अच्छे दिन' आले आहेत. सरकारच्या या नव्या निर्णयानुसार खरिपाच्या चौदा पिकांच्या हमीभावात घसघशीत सरासरी चाळीस ते पन्नास टक्के म्हणजेच २०17 च्या तुलनेत प्रति क्विंटल १४०० ते १८०० रुपयांची वाढ झाल्याने, शेतकऱ्यांना केलेल्या श्रमाचे या नव्या हमीभावाने किमान दाम मिळेल, अशी अपेक्षा आहे.**

डॉ. स्वामीनाथन समितीच्या शिफारशीनुसार शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट भाव मिळावा, अशी मागणी गेली बारा वर्षे देशातल्या शेतकरी संघटना आणि शेतकऱ्यांनी आंदोलने, मोर्चेद्वारे सातत्याने केली होती. आपल्या सरकारच्या कारकिर्दीत शेतीचे उत्पादन दुप्पट करण्याबरोबरच वाजवी भाव द्यायची ग्वाही मोदी यांनी लोकसभेच्या निवडणुकीच्या प्रचार सभात केली होती. गेल्या वर्षी खरिपाच्या चौदा पिकांच्या हमी भावात वाढ करून सरकारने त्यानुसार खरेदीही केली. आता लोकसभेच्या निवडणुका वर्षभरात होणार असल्याने, शेतकरी राजाला खूश करायच्या उद्देशाने का होईना, पण सरकारने हमीभावाच्या किंमती वाढवायचा निर्णय जाहीर केला. अन्नधान्याचे भाव ठरवताना, जमीन भाडे वगळता, नांगरट, बियाणे, खते, मजुरी, पाणी, औषधे, या सर्व खर्चाचा विचार उत्पादन खर्च ठरवताना सरकारने केला आहे. या सूत्रानुसारच चौदा पिकांचा हमीभाव उत्पादन खर्चाच्या दीडपट ठरवला गेल्याचा सरकारचा दावा आहे. सरकारच्या या निर्णयाचे सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने स्वागत केले असले, तरी सरकारची ही घोषणा म्हणजे आकड्यांचा खेळ असल्याची टीका काँग्रेस पक्षासह अन्य विरोधी पक्षाच्या आणि शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी केली असली, तरी शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाचा मूलभूत विचार अन्नधान्याच्या खरेदी हमीभावासाठी गृहीत धरण्यात आला, ही बाब महत्त्वाची ठरते. शेतकरी संघटनेचे संस्थापक शरद जोशी यांनीच उत्पादन खर्चाशी सांगड घालून शेतीमालाला दुप्पट भाव मिळावा, अशी मागणी देशात सर्वप्रथम करताना, त्यात शेतीची किंमतही गृहीत धरावी, असा आग्रह सरकारकडे केला होता. याच मागणीसाठी त्यांनी शेतकरी संघटनेमार्फत राज्यात आणि देशभरात उग्र आंदोलनेही केली. त्यांच्याच आंदोलनामुळे बाजारभावापेक्षा कमी किंमतीत शेतकऱ्यांकडून सक्तीने वसूल केली जाणारी लेव्ही धान्य खरेदीची पद्धत सरकारला बंद करावी लागली आणि खुल्या बाजारात बाजारभावाप्रमाणे किंवा हमीभावाने धान्याची खरेदी प्रक्रिया सुरू करावी लागली. सरकारने खरिपाच्या चौदा पिकांसाठी जाहीर केलेल्या हमीभावाच्या किंमती, गेल्या दहा वर्षात पिकांच्या उत्पादनासाठी वाढलेला खर्च, महागाई याचा विचार करता कमी असल्या, तरी शेतीमालाला वाजवी भाव मिळणे हा शेतकऱ्यांचा हक्क असल्याचे केंद्र सरकारने मान्य केले, हा शेतकरी संघटनांच्या आणि शेतकऱ्यांच्या आंदोलनांचाच विजय होय!

दहा वर्षातली मोठी वाढ

माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या कारकिर्दीत २००८-२००९ मध्ये केंद्र सरकारतर्फे खरिपाच्या पिकांसाठी सरासरी ३० ते ४० टक्क्यांची वाढ जाहीर झाली होती. त्यानंतर त्या सरकारने पुढच्या चार वर्षात हमीभावाच्या किंमतीत काहीही वाढ केली नव्हती. मोदी सरकारने गेल्या वर्षी खरिपाच्या पिकांसाठी हमीभावात वाढ केली. पण आताची ही वाढ गेल्या १० वर्षातली सर्वात मोठी आहे. या नव्या हमीभावाच्या किंमतीनुसार ज्वारी, नाचणी, काळे तीळ, या धान्याच्या भावात सरासरी चाळीस टक्क्यांची वाढ झाली तर मका, मूग, सोयाबीन, सूर्यफूल, भुईमूग या पिकांसाठी सरासरी १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे. तांदळाच्या हमीभावात झालेली वाढ मात्र प्रति क्विंटल २०० म्हणजे सरासरी १२ टक्के इतकीच आहे. तूर, उडीद, या कडधान्यांच्या किंमतीतही सरासरी अवघी ५ टक्क्यांचीच वाढ होईल. गेल्या वर्षी सरकारने ३४३३ रुपये क्विंटल असा मध्यम धाग्याच्या कापसाला हमीभाव जाहीर केला होता. या वर्षी तब्बल या प्रतिच्या कापसासाठी पन्नास टक्के अधिक भाववाढ जाहीर करून, हा कापूस ५१५० रुपये प्रति क्विंटल भावाने खरेदी केला जाईल. लांब धाग्याच्या कापसासाठीही ५८ टक्क्यांची वाढ जाहीर करण्यात आली आहे. या नव्या हमीभावाने भात उत्पादक शेतकऱ्यांची निराशा झाली असली, तरी खरिपातल्या हंगामात अन्य उत्पादने घेणाऱ्या शेतकऱ्यांना मात्र सरकारकडून हमी भावाची शाश्वती मिळाल्याने, खाजगी व्यापाऱ्यांनाही याच भावाने किंवा त्यापेक्षा अधिक भावाने खरेदी करावी लागेल. गेल्या दोन वर्षात तूर, उडीद, कापूस, यासह विविध शेतीमालाची केंद्रं आणि राज्य सरकारकडून खरेदी करण्यात आली. पण या खरेदीच्या प्रक्रियेत प्रचंड गोंधळ झाल्याने, तूर उत्पादक शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी भावाने खाजगी व्यापाऱ्यांना तुरीची विक्री करावी लागली होती. या नव्या वाढीव हमीभावाच्या खरेदीसाठी केंद्र सरकारला १५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निधीचा बोजा पडेल. राज्य सरकारांनाही हमीभावाने खरिपांच्या पिकांची-धान्याची खरेदी करताना अधिक निधी खर्च करावा लागेल. पण त्याचा आर्थिक लाभ देशातल्या १२ कोटी शेतकऱ्यांना होणार आहे. या वर्षी घोषित केलेल्या खरीप हंगामाच्या पिकांच्या हमीभावानुसार देशातल्या शेतकऱ्यांकडून धान्य, कापूस, कडधान्यांची खरेदी करायसाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी या पिकांच्या मळण्यांच्या हंगामापूर्वीच म्हणजे सप्टेंबर-ऑक्टोबरपासून देशभरात खरेदी केंद्रांची साखळी निर्माण करायला हवी. या सर्व केंद्रांवर मोजणी, मापाडी, गोदामे, बारदान, वजन काटे, यासह सर्व सुविधा उपलब्ध करून द्यायला हव्यात. खरिपाचे पीक मळणीनंतर शेतकऱ्यांच्या हाती येताच, पंधरा दिवसांच्या आत हमीभावाने सरकारच्या खरेदी केंद्रावर त्याची शेतकऱ्यांना विक्री करून पैसे मिळायला हवेत. धान्य खरेदीची ही अंमलबजावणी चोख आणि तत्परतेने झाली, तरच खाजगी व्यापाऱ्यांवर जरब बसेल आणि हमीभावापेक्षा कमी किंमतीत शेतकऱ्यांची खरिपाची पिके खरेदी करायची, त्यांना लुटायची संधी मिळणार नाही. केंद्र सरकारने नवे हमीभाव जाहीर करून शेतकरी राजाला दिलासा दिला, हे मान्यच करायला हवे.

# गणपतीसाठी मंडप परवानगी ऑनलाइन



**नवी मुंबई - महापालिका क्षेत्रात गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मंडप उभारणीच्या परवानगीसाठी मंडळांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी महापालिका प्रशासनाने ई-सेवा कम्प्युटर प्रणाली विकसित केली आहे. सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळांना ऑनलाइन ई-सेवा मंडप परवानगी कम्प्युटर प्रणालीची माहिती देण्यासाठी तसेच डॉ. महेश बेडेकर यांनी उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन होण्याच्या दृष्टीने महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.**

१३ सप्टेंबरपासून गणेशोत्सव सुरू होणार असून तब्बल दोन महिने आधी १३ जुलैपासून पालिकेच्या www.nmmc.gov.in या वेबसाइटवर मंडप परवानगीसाठीची ई-सेवा प्रणाली उपलब्ध होणार आहे. नवी मुंबई महापालिकेने हे विशेष सॉफ्टवेअर विकसित केले असून यामुळे मंडळांना आवश्यक असलेल्या महापालिका, पोलिस, वाहतूक पोलिस, अग्निशमन यांच्या परवानगी-दाखल्यांसाठी वेगवेगळे अर्ज करावे लागणार नाहीत. तसेच, वेगवेगळ्या कार्यालयांमध्ये जावे लागणार नाही. महापालिकेने विकसित केलेल्या ऑनलाइन प्रणालीद्वारे मंडळांना आहे त्या ठिकाणाहून अर्ज करता येणार आहेत. महापालिकेच्या विभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रात १३ जुलैपासून सायंकाळी तीन ते पाच या वेळेत मंडळांना अर्ज भरण्यासाठी सहकार्य केले जाणार आहे.

मंडळांमार्फत दाखल केला जाणारा अर्ज महापालिकेच्या संबंधित विभाग अधिकाऱ्यांकडे तसेच त्यावेळी संबंधित पोलिस ठाणे, वाहतूक पोलिस विभाग व अग्निशमन अधिकाऱ्यांकडे वर्ग होणार आहेत. त्यांनी त्यावर निर्णय घेऊन पाच दिवसांच्या कालावधीत ऑनलाइन ना हरकत प्रमाणपत्र दाखल करावयाचे आहे. पाच दिवसांचा कालावधी उलटून गेल्यास हा अर्ज त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ऑनलाइन वर्ग केला जाणार आहे. त्यामुळे मंडळांना विहित कालावधीत परवानगी मिळणे सोयीचे ठरणार आहे. या तिन्ही प्राधिकरणांकडून ना-हरकत दाखले प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभाग कार्यालयाच्या उप अभियंत्यांकडून प्रत्यक्ष मंडपाच्या जागेची पाहणी व मंडपाची आखणी करण्यात येऊन त्याचे जीपीआरएस छायाचित्र ऑनलाइन अपलोड केले जाणार आहे.

# भाईंदर पोलिसांनी बनावट नोटांच्या आरोपींकडून जप्त केला प्राणघातक शस्त्रसाठा

**भाईंदर-** बनावट नोटा बाळगणाऱ्या आरोपींना गेल्या आठवड्यात अटक करण्यात आल्यानंतर त्यांच्या घराच्या तपासणीत प्राणघातक हत्यारांचा साठा पोलिसांना सापडला आहे. या प्रकरणातला नोटांची छपाई करणारा मुख्य आरोपी अद्याप फरार असून त्याचा शोध पोलीस घेत आहेत.



गेल्या आठवड्यात नवघर पोलिसांनी गोल्डन नेस्ट उड्डाणपुलाजवळ एका वाहनातून जाणाऱ्या पाच जणांना अटक केली होती. त्यांच्या झडतीत त्यांच्याकडे २००० आणि २०० रुपयांच्या तब्बल एक लाख वीस हजारांच्या बनावट नोटा आढळून आल्या होत्या. फैजल हिदरीस शेख, इम्रान अस्लम चारोली, सैय्यद रिझवान अय्याद सैय्यद, सौद सय्यद सलीम आणि अमन मेखिया या पाच जणांना अटक केली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम भालसिंग आणि साहाय्यक निरीक्षक टिकाराम थाटकर यांनी आरोपींच्या घरांची तपासणी केली असता घरात २००० आणि ५०० च्या आणखी २९ हजार रुपये किमतीच्या बनावट नोटा सापडल्या, तसेच चार धारदार तलवारी, एक कुकरी आणि एक एअर गन अशी प्राणघातक हत्यारे सापडली आहेत. या हत्यारांचा आरोपी नेमका कशासाठी वापर करत होते याचा तपास पोलीस करत आहेत. यासोबत पेपर कटर तसेट नोटा छपाईसाठी आणलेले कागद आदी साहित्यही घरात सापडले आहे.अटक करण्यात आलेले आरोपी बनावट नोटा बाजारात खपवण्याचे काम करत होते. आरोपींकडे सापडलेल्या बनावट नोटा घेऊन आरोपी भाड्याच्या गाडीने गोव्याला चालले होते. बनावट नोटा छापण्याचे काम यातील एक आरोपी फैजल याचे वडील मोहम्मद हिदरीस शेख करतात.

# प्लास्टिकबंदीमुळे वृत्तपत्रांच्या रद्दीला 'भाव'

**अंबरनाथ-** राज्यभर लागू झालेल्या प्लास्टिकबंदीमुळे सर्वसामान्यांच्या अडचणींत काहीशी भर पडली असली, तरी याचा एक चांगला फायदाही दिसून येत आहे.



प्लास्टिक पिशव्यांवर आलेल्या बंदीमुळे कागदी पिशव्यांची मागणी अचानक वाढली असून, त्यामुळे वृत्तपत्रांच्या रद्दीलाही चढा भाव आला आहे. काही दिवसांपूर्वी १२-१४ रुपये किलोने खरेदी केली जाणारी वृत्तपत्रांची रद्दी आता १८ ते २० रुपये किलो दराने खरेदी केली जात आहे. प्लास्टिकबंदी लागू झाल्यापासून प्लास्टिक पिशव्यांना पर्याय शोधण्यासाठी साऱ्यांचीच धावाधाव सुरू झाली आहे. कागदी पिशव्या हा प्लास्टिकला सर्वात सोपा व स्वस्त पर्याय आहे. त्यामुळे दुकानादुकानांतून कागदी पिशव्यांचा वापर वाढला आहे. साहजिकच यामुळे कागदी पिशव्या बनवणाऱ्यांकडील मागणी वाढली असून कागदाची मागणीही वाढली आहे. याचा परिणाम घराघरांतून महिनाअखेरीस विकल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांच्या रद्दीच्या दरांवर झाला आहे. एकेकाळी १२ ते १४ रुपयांना विकल्या जाणाऱ्या वृत्तपत्राच्या रद्दीला आता १८ ते २० रुपयांपर्यंत भाव मिळतो आहे. त्यात मराठी वृत्तपत्रांचा भाव तुलनेने कमी असला तरी इंग्रजी आणि बड्या वृत्तपत्रांच्या चांगल्या दर्जाच्या कागदाला चांगला भाव मिळतो आहे. जुनी पुस्तके, शिकवण्याच्या नोट्स आणि नियतकालिकांच्या कागदाला चांगला भाव मिळतो आहे.

# बदलापुरात रस्ते कामांची दीड वर्षे रखडपट्टी

**बदलापूर-** काँक्रिट रस्त्यांच्या नावाने मोठा गाजावाजा करत 'एमएमआरडीए'च्या माध्यमातून सुरू झालेल्या कामांची रखडपट्टी सुरूच असून दीड वर्षांनंतरही काम अपूर्ण राहिल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागते आहे. बदलापूर पूर्वेतील शिरगाव भागात अशाच रस्त्यांची कामे रखडले असून दोन रस्त्यांमधील भाग अर्धवट राहिल्याने चिखल आणि पाण्यामुळे येथून चालणेही मुश्कील झाले आहे. त्यामुळे नागरिकांत संतापाचे वातावरण आहे. गेल्या तीन वर्षांत रस्त्यांच्या कामांसाठी बदलापूर पालिकेला कोट्यवधींचा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात एमएमआरडीएच्या माध्यमातून उपलब्ध झाला होता. दोन वर्षांपूर्वी एमएमआरडीएचा निधी मिळवण्याची जणू स्पर्धाच तत्कालिन नगराध्यक्ष आणि आमदार यांच्यात सुरू होती. मात्र या स्पर्धेमुळे शहराच्या झोळीत कोट्यवधींचे रस्ते पडले, त्यामुळे नागरिकांत समाधानाचे वातावरण होते. शहरातील विविध भागात या रस्त्यांचे काम गेल्या



वर्षी सुरू करण्यात आले. यात शिरगाव भागातील काथोडवाडी ते सह्याद्री चौक पर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे कार्यादेश एप्रिल २०१७ मध्ये देण्यात आले होते. दोन कोटी ८० लाख रुपयांचे हे काम ऑक्टोबरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. त्यानंतर सहा महिन्यांची मुदत देऊनही आजतागायत हे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. त्यामुळे येथून ये जा करणाऱ्या नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतो आहे. तसेच या भागात पाण्याचा निचरा होण्यासाठी एक मोरी होती. मात्र त्या मोरीची जागा बदलून ती दुसऱ्या ठिकाणी बांधल्याने पाण्याचा निचरा योग्यरित्या होत नाही. त्यामुळे पाणी जमा होत असून त्याचा नागरिकांना त्रास होत असल्याचा आरोप स्थानिक नगरसेवक अरूण सुरवळ यांनी केला आहे.

याबाबत गेल्या महिन्यात मुख्याधिकारी प्रकाश बोरसे, स्थानिक देखरेखीवर असलेले पालिकेचे अभियंते यांनाही पत्राद्वारे याबाबत माहिती दिली होती. मात्र आजवर पालिकेकडून कोणत्याही प्रकारचे काम येथे करण्यात आली नसून पालिका प्रशासन याबाबत गंभीर नसल्याचा आरोप सुरवळ यांनी केला आहे.

# नवी मुंबईत व्यापाऱ्याची भररस्त्यात गोळया झाडून हत्या

**नवी मुंबई-** नवी मुंबईतील कामोठे सेक्टर सहा मधील व्यापारी शांताराम कुटाळ यांची बुधवारी रात्री गोळ्या घालून हत्या करण्यात आली. या घटनेने एकाच खळबळ उडाली आहे. ज्यांची हत्या करण्यात आली त्या कुटाळ यांचा दुधे चौकात गाड्यांच्या बॅटरी विकण्याचा व्यवसाय होता. बुधवारी रात्री १० वाजता दुकान बंद करून जात असताना चौकातच त्यांची हत्या करण्यात आली. आरोपीने शांताराम कुटाळ यांना पहिले चाकूने भोसकले त्यानंतर दोन गोळ्या त्यांची हत्या केली. ही हत्या व्यावसायिक कारणावरून झाली असल्याचा प्राथमिक अंदाज कोमोठे पोलीसांनी वर्तवला आहे.

# मुंबईसह महाराष्ट्रात विक्रमी पाऊस...

**(पान १ वरुन)** हिंदमाता येथील पाण्याचा निचरा करण्यासाठी ५ पंप लावण्यात आले आहेत. वडाळा चार रस्ता सुद्धा पाण्यात गेल्याने या रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली आहे. तर वांद्रे खेरवाडी येथील पुलावर खड्डे पडल्याने या पुलावरील वाहतूक इतरत्र वळवण्यात आली आहे. मात्र मिलन सबवे आणि खार सबवे येथे पाणी साचले नसल्याचा दावा पालिकेने केला आहे. गेल्या २४ तासांत दादरमध्ये १३३ मिमी पावसाची तर गोरेगावमध्ये १९३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर सकाळी ९ ते १० या एक तासांत वडाळा येथे ३३, दादरमध्ये ३१, धारावीत ३०, रावळी कॅम्प २४, चेंबूर १७, अंधेरी २८, वर्सोवा २६, वांद्रे २५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

मुंबई आणि एमएमआर क्षेत्रात सकाळपासून जोरदार पाऊस पडत असून त्यामुळे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला आहे. त्यामुळे कोणतीही समस्या निर्माण होऊ नये म्हणून मुंबई आणि एमएमआर रिजनमधील शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी विधानसभेत ही घोषणा केली.



# मल्ल्याला झटका; लंडनमधील मालमत्तेवर कारवाई

**लंडन- भारतीय बँकांचे नऊ हजार कोटी रुपयांचे कर्ज बुडवून परदेशी फरार झालेल्या विजय मल्ल्या याला मोठा झटका बसला आहे. मल्ल्याच्या मालमत्ता जप्तीसंबंधी येथील उच्च न्यायालयात सुरू असलेल्या खटल्याच्या गुरुवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने भारतीय बँकांच्या बाजूने निकाल दिला. या आदेशानुसार ब्रिटनच्या सक्तवसुली अधिकाऱ्यांना मल्ल्याच्या निवासस्थानी तसेच, त्याची मालमत्ता असलेल्या ठिकाणी प्रवेश करण्याची परवानगी मिळाली आहे. न्यायालयाने मल्ल्याच्या मालमत्तांमध्ये प्रवेश करण्याचा आदेश दिला नसला तरी या परवानगीच्या आधारे त्याच्या निवासस्थानी तसेच, मालमत्ता असलेल्या ठिकाणी प्रवेश करून कारवाई करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नेतृत्वाखाली न्यायालयीन लढा देणाऱ्या बँकांना मिळालेले हे मोठे यश आहे.**

लंडनजवळील हर्टफोर्डशायर येथे मल्ल्याची मालमत्ता आहे. तसेच, लेडीवॉक व तेविन, वेल्विन येथील ब्रेम्बेल लॉज येथे मल्ल्याचे सध्या वास्तव्य आहे. या सर्व मालमत्तांमध्ये प्रवेश करण्याचा बँकांचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायालयीन परवानगीच्या आधारे सक्तवसुली अधिकाऱ्यांच्या साह्याने या मालमत्तांमध्ये प्रवेश करून बुडीत कर्जाची रक्कम वसूल करण्याची संधी बँकांना मिळाली आहे.

यूकेज ट्रिब्युनल कोर्ट अँड एन्फोर्समेंट अ‍ॅक्ट २००७च्या आधारे न्यायालयाने हा निकाल दिला आहे. याच न्यायालयाने मेमध्ये झालेल्या सुनावणीतही भारतीय बँकांना दिलासा दिला होता. मल्ल्याच्या जगभरातील मालमत्ता जप्त करण्याचा भारतातील न्यायालयाचा निकाल या न्यायालयाने कायम ठेवला होता. स्टेट बँकेच्या नेतृत्वाखालील बँकांमध्ये बँक ऑफ बडोदा, कॉर्पोरेशन बँक, फेडरल बँक लि., आयडीबीआय बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, जम्मू अँड काश्मीर बँक, पंजाब अँड सिंध बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ मैसूर, यूको बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया आणि जेएम फायनान्शिअल रिकन्स्ट्रक्शन कं. प्रा. लि. यांचा समावेश आहे. भारताने केलेल्या प्रत्यार्पणाच्या याचिकेलाही मल्ल्याने याचिकेद्वारे आव्हान दिले आहे.

मल्ल्याच्या १५९ मालमत्ता आढळल्या असून यातील बहुतांश मालमत्तांवर ईडीच्या (सक्तवसुली संचालनालय) मुंबई कार्यालयाने टाच आणली आहे तसेच, त्याच्या अन्य काही मालमत्ता या अवसायनाच्या प्रक्रियेत आहेत, अशी माहिती बंगळुरू पोलिसांनी ईडीच्या वतीने दिल्ली न्यायालयाला गुरुवारी दिली.

# आता ब्रॉडबॅण्डमध्ये 'जिओ'क्रांती



**मुंबई-** अतिशय अल्प किंमतीत मोबाइल टेलिफोनच्या माध्यमातून मोफत कॉलिंग आणि डेटाची खैरात करून अन्य मोबाइल कंपन्यांपुढे आव्हान निर्माण करणाऱ्या मुकेश अंबानी यांनी अतिउच्चतम वेग असणाऱ्या 'जिओगिगा फायबर' ब्रॉडबॅण्ड सेवेची गुरुवारी घोषणा केली. ही सेवा देशातील अकराशे शहरांमध्ये लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहे.

'रिलायन्स इंडस्ट्रिज'ची ४१वी वार्षिक सर्वसाधारण सभा मुंबईत गुरुवारी झाली. या वेळी अंबानी यांनी 'जिओ फोन २' 'जिओगिगा राऊटर' आणि 'जिओ गिगा टीव्ही सेट'चीही घोषणा केली. सर्वसामान्यांनी आपलेसे केलेल्या 'जिओफोन'ची सुधारित आवृत्ती 'जिओफोन २'च्या माध्यमातून सादर करण्यात येणार आहे. या फोनची किंमत २,९९९ रुपये असून, त्यामध्ये व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक आणि यूट्यूबची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या सर्व सुविधांसाठी नोंदणीची सुरुवात १५ ऑगस्टपासून करण्यात येणार आहे. मात्र, या सुविधा नेमक्या कधीपासून सुरू होणार, या विषयी माहिती देण्यात आली नाही.

डेटाचा वापर वाढत असल्याने प्रति सेकंद मेगाबाइट (एमबीपीएस) ही संकल्पना लवकरच कालबाह्य होणार असून, ती जागा प्रति सेकंद गिगाबाइट (जीबीपीएस) घेण्याची शक्यता असल्याचे मुकेश अंबानी यांनी नमूद केले. 'जिओगिगा फायबर ब्रॉडबॅण्ड'या अतिवेगवान फिक्स्ड लाइनच्या माध्यमातून येत्या पाच वर्षांत भारत फिक्स्ड लाइन ब्रॉडबॅण्ड सेवेत पहिल्या पाच देशांमध्ये स्थान मिळवेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला. या सेवेमध्ये भारताचा सध्या १३४वा क्रमांक लागतो. सध्या १० हजार घरांमध्ये या सेवेची चाचणी घेण्यात येत आहे.

# झाकीर नाईकला भारतात पाठवणे शक्य नाही

## मलेशिया सरकारची आडमुठी भूमिका

**नवी दिल्ली-** वादग्रस्त मुस्लिम प्रचारक झाकीर नाईकला भारतात पाठवणे शक्य नाही अशी आडमुठी भूमिका आता मलेशिया सरकारने घेतल्याचे समोर आले आहे. मलेशियाचे पंतप्रधान महाथीर मोहम्मद यांनी शुक्रवारी हा निर्णय जाहीर केला आहे. चिथावणीखोर भाषणांद्वारे मुस्लिम तरूणांना दहशतवादाकडे वळवल्याचा, बनावट कंपन्यांच्या माध्यमातून निधी गोळा करून दहशतवादी कारवायांसाठी उपलब्ध करून देण्याचा गुन्हा त्याच्यावर दाखल आहे. गुरुवारपर्यंत समोर आलेल्या महितीनुसार भारताने केलेल्या प्रत्यार्पणाच्या मागणीवर मलेशिया सरकार विचाराधीन आहे अशी माहिती समोर आली होती. मात्र आज मलेशियाचे पंतप्रधान महाथीर मोहम्मद यांनी झाकीर नाईकच्या प्रत्यार्पणाला नकार दिला आहे असे समजते आहे. एएनआयने या संदर्भातले वृत्त दिले आहे. झाकीर नाईकमुळे कोणतीही समस्या निर्माण झालेली नाही. त्यामुळे त्याच्या प्रत्यार्पणाचा प्रश्नच निर्माण होत नाही असे मलेशियाच्या पंतप्रधानांनी म्हटले आहे. कुआलालंपूरबाहेर असलेल्या पुतराज्या या ठिकाणी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांना झाकीर नाईकच्या प्रत्यार्पणासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला तेव्हा त्यांनी झाकीर नाईकला भारतात पाठवणे शक्य नसल्याचे म्हटले आहे. झाकीर नाईक या मुस्लिम धर्मप्रचारकाने २०१६ मध्येच भारत सोडला आहे. धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या चिथावणीखोर भाषणांद्वारे तरुणांना दहशतवादाकडे वळण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी डॉ. झाकीर नाईकविरोधात गुन्हा दाखल झाला होता.



# लोकशाही वाचवण्यासाठी इमान राखा -शरद यादव

**मुंबई-** 'देशातील लोकशाही तसेच संविधान वाचवायचं असेल तर प्रत्येक भारतीय नागरिकांनी आपलं इमान जिवंत ठेवलं पाहिजे. इमान राखलं तरच देश प्रगतीपथावर जाईल, देशातील सर्व वाईट गोष्टींचा आपण सामना करू', असं प्रतिपादन समाजवादी नेते शरद यादव यांनी आज मुंबईत केलं. आमदार कपिल पाटील यांच्या मुंबई शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत विजयाची हॅट्रिक झाल्यानिमित्त शिक्षक भारतीनं दादरच्या शिवाजी मंदिरात संकल्प मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात ते बोलत होते. मुंबईच्या शिक्षकांनी इमानदारी दाखवत कपिल पाटील यांना तिसऱ्यांदा आमदार करून चांगला संदेश दिला आहे. देशातील सर्व मतदारांनी चांगल्या माणसांना मते देण्याचा धडा यातून घेतला पाहिजे, तरच आपण सध्याच्या अघोषित आणीबाणीचा सामना करू शकू, मनुवादी शक्तींचा पराभव करू शकू, असे यादव म्हणाले.



# दिल्लीत रस्सीखेच सुरूच

**नवी दिल्ली- जनतेने निवडून दिलेले दिल्लीचे सरकार आणि केंद्राने नेमलेले उपराज्यपाल यांच्या अधिकारक्षेत्रांविषयी सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने स्पष्ट निकाल देऊनही दिल्लीतील 'आप' सरकार आणि उपराज्यपाल अनिल बैजल यांच्यातील रस्सीखेच संपली नाहीच. दिल्लीच्या सेवा विभागाने दिल्लीच्या मंत्र्यांचे आदेश मानण्यास नकार दिल्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांवरून पुन्हा वादाची ठिणगी पडली.**

दरम्यान, केजरीवाल यांनी पत्र लिहून उपराज्यपालांना भेटण्याची वेळ मागताना सर्वोच्च केंद्रीय गृह मंत्रालयाने २१ मे २०१५ रोजी एका अधिसूचनेद्वारे सेवा विभागाचे अधिकार दिल्ली सरकारकडून काढून केंद्र सरकारच्या अधीन केले होते. या अधिसूचनेविरुद्ध केजरीवाल सरकारने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. बुधवारचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल त्या याचिकेवरच आला आहे. पोलिस, कायदा व सुव्यवस्था आणि जमीन हे तीन विषय वगळता सर्व अधिकार दिल्लीच्या निर्वाचित सरकारकडे असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला असल्याचा दावा 'आप'ने केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्त्यांविषयी निर्णय घेण्याचे अधिकार मंत्र्यांना देण्यात येत असल्याचे आदेश उपमुख्यमंत्री सिसोदिया यांनी काढले. पण सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही नोकरशाही सरकारचे आदेश



पाळत नसल्याची तक्रार करण्याची वेळ त्यांच्यावर आली. आपण दिल्ली सरकारचे आदेश पाळणार नाही, असे लेखी उत्तर दिल्लीचे मुख्य सचिव अंशु प्रकाश यांनी सिसोदिया यांना दिले. केंद्रीय गृह मंत्रालयाने २९ ऑगस्ट २०१६ रोजी अधिसूचना काढून बदल्या आणि नियुक्त्यांचे अधिकार उपराज्यपाल, मुख्य सचिव, सेवा विभागाचे सचिव आणि संबंधित खात्यांच्या सचिवांना बहाल केले होते. सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट २०१६ ची अधिसूचना रद्द केल्याची माहिती आपल्यापाशी नसल्याचे सांगून सेवा विभागाने दिल्ली सरकारच्या आदेशांचे पालन करण्यास नकार दिला आहे. अधिकारी आदेशांचे पालन करणार नसतील आणि बदल्यांच्या फायलींवर उपराज्यपालांची संमती आवश्यक असेल तर ही न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना ठरेल, असा पवित्रा घेत 'आप' सर्वोच्च न्यायालयाचा अवमान करणाऱ्या नोकरशाहीविरुद्ध कायदेशीर कारवाईचा विचार करीत आहे.

# काश्मीरमध्ये जवानांवर दगडफेक; तिघांचा मृत्यू

**श्रीनगर–** जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यातील खुदवाणी येथे आज सकाळी भारतीय जवानांचे सर्च ऑपरेशन सुरू असताना त्यांच्यावर अचानक जोरदार दगडफेक करण्यात आली. त्यामुळे भारतीय जवान आणि दगडफेक करणाऱ्यांमध्ये उडालेल्या धुमश्चक्रीत तीन जण ठार झाले आहेत. मृतांमध्ये एका अल्पवयीन मुलीचा समावेश आहे. या हिंसाचारामुळे कुलगाममध्ये तणाव निर्माण झाला असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कुलगाम जिल्ह्यातील इंटरनेट सेवा बंद ठेवण्यात आली आहे. हिजबूल मुजाहिद्दीनचा कमांडर, दहशतवादी बुरहान वाणीच्या मृत्यूला दोन वर्ष होत असल्याने फुटीरतावाद्यांनी उद्या रविवारी जम्मू-काश्मीरमध्ये बंद पुकारला आहे. त्यापार्श्वभूमीवर अतिरेक्यांकडून कोणताही घातपात होऊ नये म्हणून भारतीय जवानांनी आज पहाटे कुलगाम जिल्ह्यात सर्च ऑपरेशन सुरू केले असता दगडफेक करणाऱ्यांनी अचानक जवानांवर दगडांचा मारा सुरू केला. या हल्ल्यात ३ जवानांसहित १३ लोक जखमी झाले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात नेले असता त्यातील तिघांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.

दरम्यान, सुरक्षेच्या कारणास्तव पुलवामा आणि त्रालसहित अनेक भागांमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली आहे. बंदच्या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून रविवारी होणारी अमरनाथ यात्राही थांबवण्यात आली आहे. त्यामुळे सुमारे एक हजार अमरनाथ यात्रेकरूंना कठुआमध्ये थांबावे लागले आहे. तर १५ हजार इतर भाविकांना जम्मू, उधमपूर आणि रामबाण जिल्ह्यात थांबवण्यात आले असल्याची माहिती जम्मू-काश्मीरचे पोलीस महानिरीक्षक डॉ. एस. पी. वैद्य यांनी दिली.



# 'या' ट्विटमुळे २६ अल्पवयीन मुलींची सुटका

**नवी दिल्ली-** एका सहप्रवाशाच्या सजगतेमुळे रेल्वेतून नेल्या जात असलेल्या २६ अल्पवयीन मुलींची गोरखपूरजवळ सुटका करण्यात आली. मुझफ्फरपूर-वांद्रे अवध एक्स्प्रेसमधील एका प्रवाशाने ट्विट करून दिलेल्या इशाऱ्यानंतर जीआरपी आणि आरपीएफने या मुलींची सुटका केली. या मुलींना बाल कल्याण समितीच्या ताब्यात देण्यात आले असून त्यांच्या पालकांना कळवण्यात आले आहे.

पाच जुलै रोजी मुझफ्फरपूर-वांद्रे अवध एक्स्प्रेसच्या एस-५ या डब्यामध्ये सुमारे २५ मुली रडत असल्याचे लक्षात आल्यानंतर एका प्रवाशाने याबाबत ट्विट केले होते. ट्विटरवरील या इशाऱ्यानंतर तातडीने वाराणसी आणि लखनऊ येथील अधिकाऱ्यांनी तपासास सुरुवात केली. गोरखपूर येथील जीआरपी विभागाने चाइल्डलाइन तसेच पोलिसांच्या तस्करीविरोधी



पथकाच्या समन्वयाने ही कारवाई सुरू केली. साध्या कपड्यातील दोन आरपीएफ जवान कपटनगंज येथे या एक्स्प्रेसमध्ये चढले. 'यावेळी २६ मुली २२ व ५५ वर्षांच्या दोन पुरुषांसह प्रवास करताना आढळल्या. हे सर्वजण बिहारमधील पश्चिम चंपारण येथील आहेत.

# जम्मू-काश्मीरमध्ये सत्तास्थापनेच्या चर्चेत मुख्यमंत्रीपदाचा अडसर

**श्रीनगर-** जम्मू-काश्मीरमध्ये भाजप आणि पीडीपी यांचे युती सरकार पडल्यानंतर नव्या सरकारच्या स्थापनेसाठी हालचालींना वेग आला आहे. भाजप, पीडीपीचे बंडखोर आमदार आणि सज्जाद लोन यांच्या पीपल्स कॉन्फरन्स या मित्रपक्षाशी चर्चा करत आहे. मात्र, मुख्यमंत्रीपद कोणत्या पक्षाला द्यायचे यावरून चर्चा अडली आहे. राज्याच्या विधानसभेत एकूण ८७ आमदार असून सध्या त्यापैकी पीडीपीचे २८, भाजपचे २५, नॅशनल कॉन्फरन्सचे १५, काँग्रेसचे १२, पीपल्स कॉन्फरन्सचे २ आणि अपक्ष व इतर ९ आमदार आहेत. भाजपबरोबर पीपल्स कॉन्फरन्सचे दोन आणि



१ अपक्ष उमेदवार असून सरकार स्थापनेसाठी याशिवाय १६ आमदारांची गरज आहे. पीडीपीच्या २८ पैकी २१ आमदार भाजपसोबत जाण्यास तयार होऊ शकतात असे पीडीपीच्या वरिष्ठ नेत्यांनी सांगितले. मात्र, मुख्यमंत्रीपद कोणत्या पक्षाला द्यायचे यावरून वाद सुरू आहे. भाजप अन्य कोणतीही पदे, खाती किंवा सवलती मित्रपक्षांना देण्यास तयार आहे. पण मुख्यमंत्री पद भाजपकडेच राहील असा आग्रह आहे. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला जम्मू-काश्मीरसारख्या मुस्लीमबहुल राज्यात आपला मुख्यमंत्री असणे गरजेचे वाटते, असे सूत्रांनी सांगितले.

# आता दिव्यांग घरी बसून मतदान करणार?

**नवी दिल्ली-** मतदानासाठीच्या रांगेत तास न् तास उभं राहण्याच्या कटकटीतून दिव्यांगांची लवकरच सुटका होण्याची शक्यता आहे. दिव्यांगाना घरी बसल्या मतदान करता यावं म्हणून निवडणूक आयोग विशेष उपाययोजना आखत आहे. त्यामुळे दिव्यांगाना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

दिव्यांगांची मतदानाच्या रांगेतून सुटका करण्यासाठी त्यांच्या घरी जाऊन त्यांचं मतदान घेणं, पोस्टल मतदान घेणं आणि मोबाईल पोलिंग स्टेशन अशा पर्यायांचा निवडणूक आयोग विचार करत आहे. त्याशिवाय हे पर्याय प्रत्यक्षात येऊ शकले नाही तर मतदान केंद्रांवर दिव्यांगांना मतदानासाठी प्रथम प्राधान्य देण्याचा विचारही आयोग करत असल्याचं सूत्रांनी सांगितलं.



गेल्या आठवड्यात निवडणूक आयोगाचं राष्ट्रीय संमेलन झालं. त्यात दिव्यांगांचा मतदानाचा टक्का वाढवण्यावर विचार करण्यात आला.

# मुख्याध्यापक, शिक्षक आणि १५ मुलांवर केला बलात्काराचा आरोप

**छपरा-** बिहारच्या छपरा जिल्ह्यातील शाळेत शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीने शाळेचे मुख्याध्यापक, दोन शिक्षक आणि शाळेतील अन्य १५ मुलांवर बलात्काराचा अत्यंत गंभीर आरोप केला आहे. एकूण १८ जणांनी सहा महिने आपल्यावर बलात्कार केला तसेच व्हिडिओ काढून आपल्याला ब्लॅकमेल केले जात होते असा गंभीर आरोप या मुलीने केला आहे. परसागड गावातील दीपेश्वर बाल ग्यान निकेतन या शाळेत शिकणाऱ्या मुलीने शुक्रवारी पोलीस तक्रार दाखल केल्यानंतर हे सर्व प्रकरण उजेडात आले. या मुलीने दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारावर पोलिसांनी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि दोन मुलांना अटक केली आहे. पीडित मुलीने दाखल केलेल्या तक्रारीनुसार डिसेंबर २०१७ पासून तिच्यावर अत्याचार सुरु होते. डिसेंबर २०१७ मध्ये पहिल्यांदा वर्गातल्या एका मुलाने आपल्यावर बलात्कार केला व त्या संपूर्ण प्रसंगाचे मोबाईलवर चित्रीकरण केले. त्या मुलाने पीडित मुलीला व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. त्यानंतर अन्य पाच विद्यार्थ्यांनी तिच्यावर बलात्कार केला.



अखिल भारतीय मानव अधिकार युनियन

सभासद नोंदणी सुरु

अध्यक्ष : श्री. दिपक मोरेश्वर नाईक मो. ८४२४९८९८९८
सचिव : श्री. विनोद दशरथ मेढे मो. ८६९२०११११०

सदस्य नोंदणी कार्यालय - २, राजाराम अपार्टमेंट.
बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), ठाणे - ४०१ १०५

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)